पुढारी | ८
शनिवार, ९ जानेवारी २०१०

# विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिरास निंबोडीत प्रारंभ

सांगवी : वार्ताहर

विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बारामती तालुक्यातील सिद्धेश्वर निंबोडी येथे विशेष हिवाळी शिबिरास प्रारंभ झाला आहे. दि. ५ जानेवारी ते ९ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या या शिबिरात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सिद्धेश्वर निंबोडी येथे आयोजित हिवाळी शिबिरात बारामती येथील विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३७ विद्यार्थी व १३ विद्यार्थिनी सहभागी झाल्या असून शिबिर कालावधीत सैन्यामध्ये अभियंत्यांना संधी, वातावरण बदलाचा पृथ्वीवर होणारा परिणाम, माईड मॅपिंग, उद्योजकता विकास, भारतातील शिक्षणाची सद्यस्थिती यासह कृषीविषयक योजनांची माहिती, विविध गुणदर्शन, चित्रपट, कीर्तन, नाटक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचा समारोप राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. संजय चाकणे, प्राचार्य प्रताप बोराडे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या शिबिरासाठी सरपंच उर्मिला देवकाते व उपसरपंच उमेश धुमाळ यांचे सहकार्य लाभत आहे. प्रा. गोरक्षनाथ गोते यांच्या मार्गदर्शनाखाली डा. निर्मल साहुजी, डॉ. सुनिल ठाकरे, प्रा. प्रकाश गोगटे, सेवानंद पवार हे शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेत आहेत.



सिद्धेश्वर निंबोडीत आयोजित हिवाळी शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी सिद्धेश्वर मंदिराचा परिसर स्वच्छ केला. (छाया: अनिल तावरे)